मजकुर :—

दिनांक ०९/०५/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ’’** माहे मार्च —२०२५ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) २) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मार्च —२०२५

| | | |
|---|---|---|
| ०२ | कांदिवली पोलीस ठाणे, परिमंडळ—११, मुंबई | गु.र.क्र २११/२०२५ कलम १४०, १०३ भा.न्या.सं |

—: “ अपहरण करून जीवे ठार मारणे ’’:—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमूद गुन्हयात दि. २२/०३/२०२५ रोजी रात्रौ ०१.४५ ते पहाटे ०४.०० वा च्या दरम्यान फिर्यादी यांचा मोठा मुलगा अंश वय ०४ वर्षे यास इराणीवाडी, गल्ली नं. ०२, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील फुटपाथवर फिर्यादी यांचे भाऊ व आई समवेत झोपलेला होता. साधारण ०३.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी यांची लहान मुलगी रेशु हि रडु लागल्याने तिला दुध पाजण्याकरीता फिर्यादी या उठले असता अंश हा झोपलेल्या जागी नसल्याचे दिसुन आले. त्यावेळी त्यांनी त्यांचे पतीला उठवुन अंश दिसत नसल्याबाबत सांगितले व सर्वजण अंश यांचा शोध आजुबाजुला घेवु लागलो. सुमारे ०४.०० वा च्या दरम्यान फिर्यादी यांची बहीण नामे सलोनी हिला इराणीवाडी येथील जवळच्याच एका बिल्डींगच्या गेटच्या समोर मुलगा अंश रोडवर पडलेल्या अवस्थेत मिळुन आला. सलोनीने फिर्यादी यांना सांगीतल्यानंतर सर्वांनी जावुन पाहिले असता त्याचे अंग थंड लागले व त्याने चड्डीमध्ये शी केल्याचे दिसुन आले. त्यांनी तात्काळ एका रिक्षावाल्याचे मदतीने अंश यास शताब्दी रूग्णालयात उपचार करणेसाठी घेवुन आले. डॉक्टरांनी अंश यास तपासुन तो मयत झाल्याचे सांगितले वरून सदर बाबत मी पोलीस ठाण्यास तक्रार करण्याकरीता आले असता तेथील पोलीस पथकाने तात्काळ सी.सी.टी.व्ही ची पाहीणी केली असता सदर फुटेजवरून आमचे ओळखीचा इसम नामे अक्षय गरूड यांने फिर्यादी यांचे मुलाचे अज्ञात कारणावरून अपहरण करून त्यास जिवे ठार मारले असल्याची खात्री पटल्याने त्यांनी अक्षय गरूड यांच्या विरूध्द कायदेशीर तक्रार दिलेवरून गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती फतिमा उर्फ सोनी अकबर अन्सारी, वय २४ वर्षे |
| बळीत/मयत इसम | | अंश अकबर अन्सारी वय ४ वर्षे, |
| आरोपी अटक व दिनांक | :— | अक्षय गरूड वय २४ वर्षे<br>अटक दिनांक — २६/०३/२०२५ |

तपास कौशल्य :— दि.२२/०३/२०२५ रोजी रात्रौ ०१.४५ ते पहाटे ०४.०० वा च्या दरम्यान फिर्यादी फतिमा उर्फ सोनी अकबर अन्सारी हिचा मोठा मुलगा अंश वय ०४ वर्षे यास इराणीवाडी, गल्ली नं. ०२, कांदिवली पश्चिम,मुंबई येथील फुटपाथवर माझे भाऊ व आई समवेत झोपलेला असताना सी सी टि व्ही फुटेजमधील अक्षय गरूड यांने माझे मुलाचे अज्ञात कारणावरून अपहरण करून त्यास जिवे ठार मारले असल्याची खात्री पटल्याने माझी अक्षय गरूड यांच्या विरूध्द कायदेशीर तक्रार आहे वगैरे अशा मजकुरची तक्रार दिल्याने वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अन्वेषण अभिलेख:— मी पंकज गिरी, पोलीस निरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे मुंबई निवदेन करतो की, आज रोजी आम्ही आमचे निवासस्थानी हजर असताना कांदिवली पोलीस ठाणे रात्रपाळी पर्यवेक्षक अधिकारी, पो.नि. स्वप्निल घोंगडे यांनी आमचे मोबाईलवर संपर्क साधुन इराणीवाडी नं. ०२, कांदिवली (पश्चिम) मुंबई या ठिकाणी फुटपाथ शेजारी रस्त्यावर ४ वर्षाचा मुलगा रात्री झोपलेल्या ठिकाणाहुन बेपता झालेला होता. त्याचे नातेवाईक शोध घेत असतांना थोडया अंतरावर रस्त्याच्या कडेला तो बेशुध्द अवस्थेत स्थितीत त्याचे नातेवाईकांना मिळुन आल्याने त्या लहान मुलास रिक्षाच्या

सहायाने शताब्दी रूग्णालय, कांदिवली (प) मुंबई येथे नातेवाईकांनी उपचारा करीता घेवुन गेले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास तपासुन मयत झाल्याचे सांगीतले आहे वगैरे अशी हकीगत सांगीतल्याने आम्ही तात्काळ इराणीवाडी गल्ली नं.२ कांदिवली पश्चिम मुंबई या ठिकाणी घटनास्थळ येथे जावुन भेट दिली तेथे उपस्थितीत असलेले रात्रपाळी पर्यवेक्षक अधिकारी, पो.नि.स्वप्निल घोंगडे तसेच पोलीस ठाणे अंमलदार पोउनि गजानंद मेखाले यांच्या बरोबर घडलेल्या प्रकाराबाबत चर्चा करून माहिती घेतली त्यानंतर आम्ही स्वतंत्रपणे घडलेल्या प्रकाराबाबत तपास करीत असताना, त्या दरम्यान मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ११, मुंबई, मा.सहायक पोलीस आयुक्त, मालवणी विभाग, मुंबई, मा. वरि ठ पो. निरीक्षक रविंद्र अडाणे, पोलीस निरीक्षक हरीश गवळी, पो.नि. अरविंद कांबळे, सहा.पो.निरीक्षक हेमंत गिते गुन्हे प्रकटीकरण व पथक, सहा.पो.निरीक्षक सोहम कदम गुंडा पथक व पथक सपोनि प्रणित पारधी, पोउनि श्रीकांत मगर ए.टी.सी व पथक, यांनी घटनास्थळी भेट देवुन वरि ठांनी दिलेल्या सुचने प्रमाणे घटनास्थळ येथे घडलेल्या प्रकाराबाबत मयताचे नातेवाईक यांचेकडे प्राथमिक चौकशी करून आम्ही व आमचे मदतीस असलेले वरील पोलीस अधिकारी व अंमलदार असे घटना घडलेल्या परिसरातील सी.सी.टि.व्ही फुटेज चेक करून परिसरातील रहिवाशी लोकांच्याकडे चौकशी करून माहिती घेत असताना आम्हाला गुन्हयाच्या तपासाकरीता नेमलेले पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना सहायक पॉलीक्लिनीक रूग्णालय, इराणीवाडी रोड नं.०४ शंकर मंदिर जवळ, कांदिवली (प) मुंबई येथील सी.सी.टि.व्ही फुटेज मध्ये एक अनोळखी इसम मध्यरात्री मयत मुलगा अंश अकबर अन्सारी, यास उचलुन रस्त्याने घेवुन जात असल्याचे दिसत असल्याने त्याबाबत खात्री करण्याकरीता सदरचे लागुपुर्ते तात्पुरते सी.सी.टि.व्ही फुटेज प्राप्त करून घेवुन सदरचे सी.सी.टि.व्ही फुटेज मयताचे नातेवाईक मयतांची आई सोनी उर्फ फतिमा अकबर अन्सारी यांना दाखवुन खात्री केली असता मयताचे आई सोनी उर्फ फतिमा अकबर अन्सारी हिने मयत मुलगा अंश यास उचलुन घेवुन जाणाऱ्या इसमाचे नाव त्यांच्या ओळखीचा अक्षय गरूड हा असल्याचे सी.सी.टि.व्ही फुटेज पाहुन त्यांनी ओळखुन सांगीतले आहे. तसेच अक्षय गरूड यांनीच मुलगा अंश याचे अज्ञात कारणावरून अपहरण करून त्यास जिवे ठार मारल्या बाबतची कांदिवली पोलीस ठाणे येथे खबर दिल्याने पोलीस निरीक्षक स्वप्निल घोगंडे यांनी तसा सविस्तर जबाब नोदवुन गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयास मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ११ व मा. सहायक पोलीस आयुक्त मालवणी विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांदिवली पोलीस ठाणे यांनी गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन तपासाबाबत सुचना दिलेल्या आहे. त्याप्रमाणे गुन्हयातील निष्पन्न फरारी आरोपी अक्षय गरूड यांचा तपास करण्याकरीता यापुर्वी आदेश दिल्याप्रमाणे तपास पथक गुंडा पथकाचे सपोनि सोहन कदम त्यांच्या पथकातील पो.ह. जायभाये यांना आरोपी वापरत असलेल्या मोबाईलचे सीडीआर/एसडीआर यांचे विश्ले ाण करून आरोपीत हा गुन्हा केल्या पासुन फरारी असुन तो कोणा कोणाच्या संपर्कात आहे वगैरे याबाबत तपास करणेबाबत समक्ष सुचना दिलेल्या आहेत. तसेच गुन्हे प्रकटीकरण विभागाचे सपोनि हेमंत गिते सफौ गोटमुकले, पो.शि. सचिन कदम यांना गुन्हा घडले परिसरातील तसेच कांदिवली पोलीस ठाणे हद्दीत रेल्वे स्टेशन सार्वजनिक जागेत असलेले सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासण्याकरीता तसेच आरोपीचा ठावठिकाणाचा शोध घेण्याकरीता आरोपी वापरत असलेल्या मोबाईलचे मोस्ट कॉलर याबाबत तसेच आरोपीचे मित्र नातेवाईक लपण्याची ठिकाणे या ठिकाणी जावुन तपास करणेबाबत सुचना दिल्या आहेत. तसेच पोलीस उप निरीक्षक तुषार सुखदेवे मालाड पोलीस ठाणे तसेच कांदिवली पोलीस ठाणे कडील पोलीस उप निरीक्षक श्रीकांत मगर, पोलीस उप निरीक्षक साटम, पोलीस उप निरीक्षक शिंदे, सफौ दळवी, पो.ह. गावकर, पो.ह जगदाळे, पो.ह तावडे, पो.ह नारनवर, पो.शि. हिरेमठ, नवलु, जोगलपुरे, केदार यांना दाखल गुन्हयाचे माहिती सांगुन गुन्हयातील आरोपीतचा पळुन जाण्याचा मार्ग, महत्वाचे रस्त्ये रेल्वे या ठिकाणी असलेले सी.सी.टी.व्ही फुटेज मोकळी मैदाने मोकळया जागा या ठिकाणी तपास करणेबाबत वगैरे समक्ष सुचना देवुन तसे लेखी आदेश दिलेले होते. त्याप्रमाणे वरील अधिकारी यांनी समक्ष दिलेल्या सुचने प्रमाणे गुन्हयातील निष्पन्न फरारीत आरोपीत यांचा कांदिवली पोलीस ठाणे हद्दीत तसेच कांदिवली पोलीस ठाणे

हद्दीच्या लगतच्या हद्दीत रेल्वे स्टेशन व इतरत्र आरोपीतांचा तपास केला परंतु आरोपीतांचा ठाव ठिकाणाबाबात काही एक माहिती मिळुन येत नसल्याबाबत त्यांनी आम्हास कळविले असुन वरील सर्व अधिकारी यांना गुन्हयातील फरारी आरोपी यांच्या तपासाकरीता पुन्हा सुचना देवुन तपासाकरीता रवाना करण्यात आलेले आहे.

सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपी अक्षय गरूड यांचा तपास करण्याकरीता यापुर्वी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्याप्रमाणे त्यांनी फरारी आरोपीत यांचा तपास करून आम्हास कळविले की, गुन्हयातील निष्पन्न आरोपी अक्षय गरूड हा कांदिवली येथील एका मेडिकल दुकानांत कामास होता. तेथुन अक्षय यांचा राहण्याचा पत्ता घेतला असता तो रूम नं. १३८, वळनाई वसाहत, ऑर्लेम चर्च, मालाड (पश्चिम) मुंबई या ठिकाणी राहावयास असल्याने सदर ठिकाणी अक्षय यांचा तपास केला असता आरोपीत हा त्याचे राहते घरी मिळुन आलेला नाही. गुन्हयांतील निष्पन्न आरोपी यांचा तपास करण्याकरीता त्याचे नातेवाईकांची माहिति घेतली. तसेच सदर गुन्हयांतील आरोपीताचा तपास करण्याकरीता यापुर्वी सुचना दिल्या प्रमाणे गुन्हे प्रकटीकरणाचे पोलीस अधिकारी यांनी आरोपीत वापरत असलेल्या मोबाईल नंबरचे सी.डी.आर/एस.डी.आर प्राप्त करून घेवुन त्याचे विश्लेषण करून तपास केला असता गुन्हयातील निष्पन्न आरोपी अक्षय गरूड यांचे नातेवाईक गुजरात राज्यात असल्याचे तसेच आरोपीत यांचा त्यांचे राहते घरी शोध घेतला असता तो मिळुन न आल्याने आरोपीत हा गुजरात राज्यात पळुन गेल्याची खात्री झाल्याने आरोपीत यांचा तपास करण्या करीता पोउनि नारायण खाडे यांच्या नेतृत्वाखाली एक स्वतंत्र पोलीस पथक तयार करून वरि ठांच्या परवानगीने सुरत राज्य गुजरात येथे आरोपीच्या तपासाकरीता पाठविण्यात आले होते.

सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपी अक्षय गरूड यांचा तपास करणेकरीता यापुर्वी लेखी आदेश देवुन सुचना दिल्याप्रमाणे पोलीस उप निरीक्षक नारायण खाडे पो.शि. तिजारे, पो.शि. चव्हाण यांना सुरत गुजरात राज्यात पाठविण्यात आले होते. त्याप्रमाणे त्यांनी आरोपीत अक्षय गरूड यांचा तपास केला असता आरोपीत हा उधना जिल्हा सुरत राज्य गुजरात येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पोलीस ठाण्यास घेवुन आले. त्याचेकडे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने सखोली चौकशी केली असता सदर गुन्हयात सदर आरोपीचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास रितसर अटक करून सदर गुन्हा उघडकीस आणला.

## कांदिवली पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. रविंद्र परमेश्वर अडाणे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. हरिष कृष्णा गवळी | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. अरविंद लाह्याप्पा कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक | श्री. पंकज श्रीधर गिरी | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहाय्यक. पोलीस निरीक्षक | श्री. सोहन सुरेशराव कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहाय्यक. पोलीस निरीक्षक | श्री. हेमंत खंडेराव गिते | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहाय्यक. पोलीस निरीक्षक | श्री. दिपक हरिभाऊ कादबाने | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोलीस उप निरीक्षक | श्री. श्रीकांत सर्जेराव मगर | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोलीस उप निरीक्षक | श्री. नितीन गजानन साटम | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरीक्षक | श्री. नारायण मच्छिंद्र खाडे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोलीस उप निरीक्षक | श्री. तुषार उत्तम सुखदेवे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पोलीस उप निरीक्षक | श्री. गजानंद प्रल्हाद मेखाले | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पोलीस उप निरीक्षक | श्री. शुभम साहेबराव शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १४ | स.फौ क्र. २९५९३ | प्रमोद सिताराम दळवी | प्रशस्तीपत्रक |
| १५ | स.फौ क्र.२९२३५ | अशोक शंकर गोटमुखले | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | पो.ह.क्र ९८०३६६ | सत्यवान शामराव जगदाळे | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र १५०८ | वामन आबाजी जायभाये | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ह.क्र ०१.८७८ | राजेश धनाजी गावकर | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ह.क्र ०३.९७२ | श्रीकांत बाबु तावडे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ह.क्र ०४.०९८० | शिवाजी सुरेश नारनवर | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ह.क्र ०९.३०८९ | स्वप्निल भगिरथ जोगलपुरे | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.क्र ०६.१९३१ | महेश नारायण डोईफोडे | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पोशिक्र ०९०६२० | योगेश रत्नाकांत हिरेमठ | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि.क्र १४.१९८८ | वैभव संतोष थोरात | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.क्र ११.३३६७ | चिरंजिवी रमेश नवलु | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.क्र ११.१६०५ | विशाल गोपाळ तिजारे | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि.क्र १३.०३१५ | परमेश्वर सुभाष चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि.क्र १४.०४८० | सचिन बाबु कदम | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.शि.क्र १५.१६३९ | वैभव तबाजी केदार | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.शि.क्र १०.००१४ | आदित्य भिकाजी राणे | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक ०९/०५/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ‘‘ **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे मार्च—२०२५ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ मार्च — २०२५

| | | |
|---|---|---|
| ०१ | बांगुरनगर पोलीस ठाणे, परिमंडळ—११, मुंबई | गु.र.क्र. २८६/२०१५ कलम ३७६ भादविसह ६,८, १०,१२ बालकांवर लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा |

—: ‘‘लहान मुलीवर लैंगिक अत्याचार’’:—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—नमुद गुन्हयातील आरोपी नामे कैलास सिताराम खरात वय ३६ वर्षे रा.ठी. दुपटे गल्ली, भगतसिंग नगर नंबर ३, इंदिरा नगर, गोरेगांव (प), मुंबई यांने फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी मिस्टी वय ७ वर्षे हिला हाताने मारहाण करून धमकी देवुन एका महिन्याचे कालावधीत वेळोवेळी जबरी संभोग केला तसेच शेवटचा जबरी संभोग हिदनांक १५/०८/२०१५ रोजी २२.३० वाजता केला व मारहाणीची धमकी देवुन लैंगिक सतावणी केली म्हणुन गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती विभा उमेश राय वय २३ वर्षे |
| बळीत | :— | **कुमारी मिस्ट उमेश राय ०७ वर्षे** |
| निकाल दिनांक | :— | दि. १७/०३/२०२५ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | कैलास सिताराम खरात वय ३६ वर्षे<br>**अटक दिनांक १६/०७/२०१५ रोजी** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | यातील मा.न्यायालयाने आरोपी २० वर्षे सश्रम कारावास अशी सजा सुनावली आहे. |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयात यातील तपासी अधिकारी यांनी सदर गुन्हयातील फिर्यादी यांची बळीत मुलीचा बळीत मुलीचा १६४ सी.आर.पी.सी अन्वये जबाब नोंद केले साक्षिदार यांचे व्यवस्थीत जबाब. तसेच घटनास्थळ पंचनामा उत्कृष्ठरित्या नोंद केले तसेच नमुद गुन्हयात आरोपीतास त्वरीत अटक करून गुन्हयाचा तपास विहित वेळेत पुर्ण करून गुन्हयाचे दोषारोप पत्र वेळेत मा.सत्र न्यायालय दिंडोशी गोरेगांव येथे दाखल केले आहे.

नमुद गुन्हयाच्या सुनावणी दरम्यान साक्षिदार यांना मार्गदर्शन करून त्यांना वेळेत मा. न्यायालयात हजर ठेवण्यात आले. तपासात प्राप्त करण्यात आलेले पुरावे मा.न्यायालयात सादर करण्यात आले

**बांगुरनगर पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहाय्यक पोलीस आयुक्त ( सेवानिवृत्त ) | श्री. दिपक लक्ष्मण फटांगरे | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | सहाय्यक पोलीस आयुक्त | श्री. हेमंत मधुसूदन सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. अनिल बापुराव ठाकरे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक | श्री. अमित शिवाजी शितोळे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. अनिल सिताराम मोरडे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | श्री. पंडीत श्रीरंग मोटे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | श्रेणी पोलीस उप निरीक्षक | श्री. भरत बळीराम विश्वासराव | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोलीस शिपाई क्रमांक — ०९२५२४ | प्रकाश आनंदराव वानखडे | प्रशस्तीपत्रक |